महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर-४४० ०२२
दुरध्वनी क्रं. ०७१२-२९५९३८१ CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल- mahajyotingp@gmail.com

**जा.क्रं.** महाज्योती/नागपूर/आस्था/40/2023-24 दिनांक :- 09/01/2024

# -:परिपत्रक:-

**विषय -: केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षण 2023-24 करिता विद्यार्थ्यांना सूचना.**

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी लागणार नाही असे जाहीर करण्यात आले होते. तथापि काही विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेस रुजू होण्यास इच्छुक नसल्याचे प्रशिक्षण संस्थेने कळविले आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादी लावणे गरजेचे झालेले आहे. तसेच यापुढे वेळोवेळी विद्यार्थी त्यांचा प्रवेश रद्द करतील त्यावेळी देखील प्रतीक्षा यादी लावावी लागणार आहे.

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक 2787 दिनांक 21/12/2023 नुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे माध्यम इंग्रजी अथवा मराठी निवडण्याकरिता लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती व त्यास अनुसरून विद्यार्थ्यांनी इंग्रजी किंवा मराठी असे माध्यम निवडले आहेत. तथापि काही विद्यार्थ्यांचे महाज्योती कार्यालयातील हेल्पलाइन कडे अशा मागण्या प्राप्त होत आहेत की जर त्यांचा मराठी माध्यमाला क्रमांक लागणार नसेल तर इंग्रजी माध्यमाकरिता त्यांचा विचार करण्यात यावा, तसेच इंग्रजी माध्यमाकरिता त्यांचा प्रवेश निश्चित होत नसेल तर त्यांचा मराठी माध्यमा करिता त्यांचा विचार करण्यात यावा.

**विद्यार्थ्यांची उपरोक्त मागणी तसेच भविष्यामध्ये प्रतीक्षा यादी लावण्याची गरज विचारात घेता विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि मराठी दोन्हीही माध्यम एकाच वेळी निवडण्याची सुविधा या परिपत्रकासोबतच्या लिंक द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.** तसेच यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांना अनावधानाने माध्यमाची निवड करण्याचे राहून गेले अशा विद्यार्थ्यांना देखील पुनश्च संधी द्यावी अशी मागणी महाज्योती कार्यालयाकडे केली होती. करिता याद्वारे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे माध्यम निवडीकरिता संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी दिनांक 12/01/2024 रोजी 11.00 PM पर्यंत दिलेल्या लिंकचा वापर करून माध्यम निवडी बाबतची कार्यवाही करावी.

स्वा
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, (महाज्योती), नागपूर